ग्रामीण कृषी मौसम सेवा
भारत मौसम विभाग
सुविड फाउंडेशन, रिसोड
वाशिम

हवामानावर आधारीत कृषि सल्ला

दिनांक : 08-04-2024

वॉशिम(महाराष्ट्र) साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2024-04-08 (पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)

हवामान घटक	2024-04-09	2024-04-10	2024-04-11	2024-04-12	2024-04-13
पर्जन्यमान (मिमी)	13.8	12.6	5.4	11.3	6.9
कमाल तापमान (अं.से)	38.1	37.8	38.2	37.7	37.8
किमान तापमान (अं.से)	21.5	21.2	20.8	20.6	20.7
सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के)	71	75	70	72	70
दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के)	39	40	35	38	37
वाऱ्याचा वेग(किमी/तास)	4	5	3	5	5
वाऱ्याची दिशा(अंश)	108	90	99	136	233
मेघाच्छादन (ऑक्टा)	5	5	4	5	4

हवामान सारांश / चेतावणी:

•वाशीम जिल्ह्यात भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र नागपूरच्या जिल्हास्तरीय मूल्यवर्धित अंदाजानुसार पुढील ५ दिवस आकाश अंशतः ढगाळ राहून दिनक ९ व १० एप्रिल २०२४ रोजी विरळ ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता तसेच दिनांक ११ आणि १३ एप्रिल २०२४ रोजी विरळ ठिकाणी खूप हलका ते हलका स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आणी दिनांक १२ एप्रिल २०२४ रोजी विरळ ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. कमाल तापमान ३८.२ ते ३७.७ अंश से. व किमान तापमान २१.५ ते २०.६ अंश से. राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. •ईशारा: दिनांक ९ एप्रिल २०२४ रोजी एक ते दोन ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना आणी गारपीट / वादळ वारा (वेग ४० ते ५० किमी/तास) , दिनांक १० एप्रिल २०२४ रोजी एक ते दोन ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना आणी वादळ वारा (वेग ३० ते ४० किमी/तास) आणि दिनांक ११ ते १३ एप्रिल २०२४ दरम्यान एक ते दोन ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

कृषि सल्ला:

• पावसाची ,विजांच्या कडकडाट व वादळी वाऱ्यासह (वेग ४० ते ५० किमी/तास) एक ते दोन ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता असल्याने भाजीपाला, फळबागा आणि इतर पिकाला पिक वाढीची अवस्था बघून आधार द्यावा. • जमिनीमध्ये ओलावा पाहून आवश्यकता असल्यास पिकाला पाणी द्यावे. तसेच ओलीतकरताना प्राधान्याने ठिबक किंवा तुषार सिंचन पद्धतीचा आवलंब करावा. • मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट,गारपीट होण्याची शक्यता असल्याने शेतात काम करत असताना मेघगर्जनेचा आवाज आल्यास तात्काळ सुरसुक्षित ठिकाणी आसरा घ्यावा. • तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाची तसेच विजेच्या कडकडाटाची तुरळक ठिकाणी गारपीटीची शक्यता असल्याने चेतावानीच्या काळात जनावरे शक्यतो चारावयास बाहेर नेऊ नये. जनावरांना उघड्यावर सोडू नये, निवाऱ्याच्या ठिकाणी बांधावे व पावसात भिजणार नाही याची काळजी घ्यावी.

संक्षिप्त संदेश सल्ला:

दिनांक ९ ते १३ एप्रिल २०२४ दरम्यान होणाऱ्या संभाव्य अवकाळी पावसाचा व वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता,काढणी केलेला शेतमाल,हळद ,तोडणी केलेले फळे-भाजीपाला ताबडतोब सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा.

पिक निहाय सल्ला:

पिक	पिक निहाय सल्ला
तीळ	•उन्हाळी तीळ पिकामध्ये फुले येण्याची व बोंडे धरण्याची अवस्था या सिंचन देण्यासाठी संवेदनशील अवस्था आहेत •या अवस्थेत पाणी कमी पडल्यास उत्पादनात घट होते. •मध्यम जमिनीत ८ ते १० दिवसांनी व भारी जमिनीत १२ ते १५ दिवसाच्या अंतराने ओलीत करावे. आणी ओलीत करतांना पिकात पाणी साचू राहणार नाही याची दक्षता घ्यावी. • ओलीत सकाळी किंवा संध्याकाळी शक्यतो तुषार सिंचनाने करावे. • तीळ पिकावरील तुडतुडे आणि पाने गुंडाळणारी अळीच्या व्यवस्थापणासाठी क्वीनॉलफॉस २५ टक्के प्रवाही २० मि.ली.प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फवारणीची कामे हि स्वच्छ व शांत हवामान असताना करावी.
भुईमूग	•वेळेवर पेरणी केलेल्या उन्हाळी भूईमुग पिकात रसशोषण करणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी इमीडाक्लोप्रीड १७.८ टक्के २.५ मिली किंवा लॅमडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के ६ मिली किंवा थायमिथॉक्झाम १२.६ टक्के लॅमडा सायहॅलोथ्रीन ९.५ टक्के ३ मिली (संयुक्त कीटकनाशक) प्रती१०लिटर पाण्यात मीसळून आलटून पालटून फवारणी करावी. •उन्हाळी भूईमुग पिकास आवशकतेनुसार ठिबक किंवा तुषार सिंचन पद्धतीने पाणी द्यावे. •उन्हाळी भुईमुग पिकात आऱ्या धरण्याच्या अवस्थे दरम्यान आंतरमशागतीची कामे टाळावी. फवारणीची कामे हि स्वच्छ व शांत हवामान असताना करावी.
मुग	•उन्हाळी मुग पिकात आवशकते नुसार २-३ कोळपण्या/खुरपण्या देऊन व निंदन करून शेत स्वच्छ ठेवावे. •उन्हाळी मुग पिकास गरजेनुसार ओलीत करावे. उन्हाळी मुग पिकात कोरडे हवामानामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी पिकास सकाळी किंवा सायंकाळी ओलीत करावे.
ज्वारी	परिपक्व रब्बी ज्वारी पिकाची काढणी करून काढणी केलेल्या शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.

फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

फळे आणि भाजीपाला पिक	फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला
हळद	सध्या हळदीची काढणी,हळद उकळणे,वाळवणे,पॉलिश करणे ही कामे सुरु आहेत. तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम पावसाची तसेच तुरळक ठिकाणी गारपीटीची शक्यता असल्यामुळे हळदीची उघड्यावर साठवणूक करू नये. काढणी केलेल्या मालाची सुरक्षित ठिकाणी (गोदामात) साठवणूक करावी.
कांदा	परिपक्व कांदा बियाणे काढणी करून काढणी केलेल्या शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.
टोमॅटो	• मागील आठवड्यातील अंशतः ढगाळ वातावरणामुळे टोमॅटो पिकामध्ये करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून असल्यास व्यवस्थापनासाठी मॅनकोझेबझे ७५ डब्लूपी लू . २५ ग्राम किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्लूपी लू . २५ ग्राम, १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • टोमॅटो पिकामध्ये फुलकिडे आणि पांढऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी थायमेथोक्झाम २५ टक्के विद्याव्य दाणेदार ४ ग्राम किंवा डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • फळ पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.फवारणीची कामे हि स्वच्छ व शांत हवामान असताना करावी.
टरबूज	• पावसाची ,विजांच्या कडकडाट व वादळी वाऱ्यासह (वेग ४० ते ५० किमी/तास) एक ते दोन ठिकाणी पाऊस,गारपीट होण्याची शक्यता असल्याने परिपक्व झालेली टरबूजाची फळे तोडून घेऊन सावलीत ठेवावी व त्यातली किडग्रस्त सडकी फळे वेगळी काढून चांगली फळे बाजारपेठेत नेण्याची व्यवस्था करावी.
भेंडी	•सध्याच्या हवामानामुळे भेंडी पिकावरील मावा तुडतुडे व फुलकिडे या रस शोषण करणाऱ्या किडीच्या प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे तरी त्याच्या व्यवस्थापनासाठी थायमीक्थोझाम २५ टक्के विद्राव्य दाणेदार २ ग्राम किंवा इमीडाक्लोप्रीड २ मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फवारणीची कामे हि स्वच्छ व शांत हवामान असताना करावी.
संत्रा	• संत्रा पाणी व्यवस्थापन: तापमानातील संभाव्य वाढ लक्षात घेता फळबागेस जमिनीच्याप्रकारानुसार ७ ते १० दिवसाच्या अंतराने दुहेरी आळे पद्धतीने किंवा चौकोनी आळे पद्धतीने पाणीद्यावे. ठिबक सिंचन उपलब्ध असल्यास १ ते ४ वर्ष वयाच्या झाडाला ९ ते ४० लिटर पाणी, ५ ते ७ वर्ष वयाच्या झाडाला ६० ते ९६ लिटर पाणी व ८ वर्षावरील झाडांना १०८ ते १३७ लिटर प्रती झाड प्रतीदिवस पाणी द्यावे. •संत्रा बागेस झाडाच्या खोडाभोवती ५ ते १० सेंटीमीटर जाडीपर्यंत पिकाच्या अवशेषांसह/

फळे आणि भाजीपाला पिक	फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला
	उपटलेल्या तणांनी आच्छादन केल्यास, बाष्पीभवन कमी होते तसेच जमिनीतील ओलावा टीकवून ठेवण्यास आणि तापमान संतुलित राखण्यासाठी मदत होते, ज्यामुळे फळांची रसाळता राखण्यात आणि फळांची गळती कमी होण्यास मदत होते. •नवीन लागवड केलेल्या व लहान झाडांना उन्हापासून संरक्षणासाठी सावली करावी तसेच खोडाभोवती आच्छादन करावे यामुळे कलमांची मर होणार नाही.
कांदा	कांदा काढणीच्या १० ते १५ दिवस अगोदर पाणी/ओलीत देणे बंद करावे. पिकाची काढणी ५० टक्के पर्यंत मना पडल्यानंतर करावी.

पशुधन विषयक निहाय सल्ला:

पशुधन विषयक	पशुधन विषयक निहाय सल्ला
गाय	मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, वादळी वारे , पाऊस होण्याची तसेच गारपीट होण्याची शक्यता लक्षात घेता गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्याव इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे.

कुकुटपालन विषयक निहाय सल्ला:

कुकुटपालन विषयक	कुकुटपालन विषयक निहाय सल्ला
पक्षी	• कोंबड्याच्या शेडशे मध्ये हवा खेळती राहण्यासाठी व्हेंटीलेटर्स (रुंद खिडक्या) ची व्यवस्था करावी तसेच उन्हाळ्यातील उष्णतेपासून त्यांना इजा होऊ नये म्हणून शेड / छतावर गवत पसरवावे. अधूनमधून या गवतावर पाणी शिंपडावे त्यामुळे शेडच्या आतील तापमान नियंत्रित राहण्यास मदत होईल. • उष्णतेपासून त्रास होऊ नये म्हणून उन्हाळ्यात कोंबळ्याना खाद्य सकाळी आणि संध्याकाळ च्या वेळेत द्यावे. • कोंबड्यांच्या सर्व पिल्लांना खाद्य समान मिळेल यासाठी खाद्याचे भांडे दिवसातून दोन वेळा भरून ठेवावे.

इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

इतर (माती / जमीन तयार करणे)	इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला
जमीन तयारी	शेतातील काडीकचरा वेचून तो न जाळता त्याचे डीकंपोजर चा उपयोग करून कंपोस्ट खत तयार करा.
माती चाचणी	शेतकऱ्यांनी माती परीक्षणासाठी पिकाच्या काढणीनंतर व नांगरणीच्या अगोदर मातीचा नमुनाघ्यावा.माती परीक्षण अहवालानुसार शेतकऱ्यांना योग्य खत व्यवस्थापन करून चांगले उत्पादन घेतायेते व रासायनिक खतांवर होणारा अवाजवी खर्च टाळता येतो
सामान्य सल्ला	हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या मागीलदिवसाच्या सकाळी ०८:३० वाजेपासून नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंदघ्यावी.